# असोसिएशन ऑफ कॉलेज अँण्ड युनिव्हरसिटी
# सुपर अॅन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

## द्वितीय वार्षिक सर्व साधारण सभा कार्यवृत्तांत

## दिनांक १८/१२/२०१२

मागील वर्षी मार्च मध्ये आपल्या असोसिएशनची वार्षिक सर्व साधारण सभा औरंगाबाद येथे झाली. त्यावेळी मागील दोन वर्षाचा कार्यवृत्तांत मी आपल्या समोर सादर केला होता. त्यानंतर असोसिएशनने जे कार्य केले त्याचा कार्यवृत्तांत सादर करीत आहे.

**१) औरंगाबाद विभाग बैठक :- दिनांक १०/०६/२०१२**

औरंगाबाद विभागाची बैठक स्वामी रामनंद तीर्थ संशोधन संस्था येथे आयोजित केली होती. या बैठकीत सचिव श्री मोहंमद शफी यांनी प्रास्ताविक केले. (१) ५ व्या वेतन आयोगातील सेवा निवृत्तीधारकांना विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशी प्रमाणे ६ व्या वेतन आयोगात वेतन निश्चिती होणे आवश्यक आहे याची माहिती डॉ.एम.डी. जहागीरदार यांनी दिली. (२) डॉ. शरद अदवंत यांनी पीएच.डी. वेतनवाढीसाठी न्यायालयीन लढया बाबतची आवश्यकता मांडली. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन मा.अध्यक्षांनी समारोप केला.

**२) धुळे बैठक :- दिनांक -**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव अंतर्गत धुळे येथील सेवा निवृत्त प्राध्यापकांचा बैठक घेणे बाबत सारखा आग्रह होता. त्या ठिकाणी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. एम.ए.वाहुळ, सचिव प्राचार्य मोहंमद शफी व औरंगाबाद येथील एक सक्रीय सदस्य डॉ. नारायण शर्मा यांनी भेट दिली. आयोजित सभेत जळगांव शाखेचे अध्यक्ष, प्राचार्य आर.डी. राणे सचिव, एम.के.येवले, कोषाध्यक्ष प्रा.ए.बी.पाटील उपस्थित होते. विविध प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर डॉ.एम.ए.वाहुळ यांनी अध्यक्षीय समारोपात प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. डॉ. शिवाजीराव सावंत आणि सहकारी यांनी बैठक आयोजन करणेसाठी बरेच परिश्रम घेतले.

**३) नासिक - पुणे विभागीय बैठक दिनांक :- ०३/०६/२०१२**

पुणे विभागांतर्गत असोसिएशनची बैठक मराठा विद्या प्रचारक समाज नासिक येथील "सी.एम.सी.एस." महाविद्यालयात मोठया उत्साहाने घेण्यात आली. बैठकीसाठी विभागातून एकूण ६५ सदस्य उपस्थित होते. कुंठीत वेतनवाढ, सेवा उपदान, पीएच.डी.वेतनवाढ, आणि सहाव्या आयोगात निवृत्ती वेतन पुनर्रचना आदि महत्वाच्या प्रश्नावर चर्चा **झाली**.

या बैठकीच्या आयोजनामध्ये डॉ. जाचक, प्राचार्य गायकवाड आणि सहकार्यांनी बरेच परिश्रम घेतले.

**४) बीड, उस्मानाबाद, बार्शी, दिनांक :- ०९/०९/२०१२.**

औरंगाबाद खंडपीठाच्या कुंढीत वेतन वाढी देण्याच्या निकालाविरुध्द महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयानत याचिका दाखल केली होती. याची माहिती या पूर्वीच आपणांस देण्यात आली होती. याबाबत शासन स्तरावर काहीच हाल चाल नव्हती. यास्तव औरंगाबाद खंडपीठामध्ये पुन्हा दोन अवमान याचिका दाखल कराव्या लागल्या. त्यानंतर वसुल रकमा व्याजासहित परत करण्याचा मार्ग मोकळा झाला. त्या आनंदाप्रित्यर्थ कोल्हापूर विभागाने खास बैठक आयोजित करुन केन्द्रीय कार्यकारणीस निमंत्रित केले होते. या बैठकीसाठी कोल्हापूरला जात असतांना दिनांक ०९/०९/२०१२ रोजी सकाळी ९ वाजता बीड येथे डॉ.जी.एम.कुळकर्णी व प्रा.पठाण यांनी आयोजित केलेल्या बैठकीस अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहुळ, प्राचार्य मंत्री जे एम., सचिव मोहंमद शफी प्रा.एस.बी.नाफाडे व प्राचार्य आर.डी. राणे हे उपस्थित होते. या बैठकीत कुंठीत वेतन वाढीच्या रकमा मिळाल्याचा आढावा घेतला. दुपारी १२ वाजता उस्मानाबाद येथे प्रा.जगदाळे, एस.बी. व प्रा.देशमुख यांनी आयोजित केलेल्या बैठकीत उपस्थिती देऊन दुपारी ठिक ३ वाजता सोलापूर विभागात बार्शी येथील बैठकीस उपस्थित राहिलो या बैठकीत न्यायालयीन निवडा पीएच.डी. वेतनवाढ व सेवा निवृत्ती वेतन पूर्नरचना या प्रश्नांवर चर्चा झाली. याच बैठकीत सोलापूर विभागाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. या बैठकीसाठी प्राचार्य व.ना.इंगळे, प्राचार्य सी.एस.मोरे आणि डॉ.बीडकर यांनी बैठक आयोजनास पुढाकार घेतला.

५) **कोल्हापूर विभागीय बैठक दिनांक :- १०/०९/२०१२**

कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.मानसिंगराव जगताप यांनी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीसाठी, कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड, निपाणी, इस्लामपूर, इचलकरंजी हया सर्व विभागातून सदस्य मोठया उत्साहाने कुंठीत वेतन वाढी प्रकरणी न्यायालयीन लढा जिंकल्या बद्दल आनंदोत्सव साजरा करण्यास उपस्थित **झाले होते**.

बैठकीच्या प्रारंभी प्राचार्यांच्या घरभाडे भत्त्याचा प्रश्न सोडविल्या बद्दल प्राचार्य क्रांती कुमार पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीत प्राचार्य विद्या कुरणे, डॉ. अशोक जगताप, प्राचार्य कासार, श्री.खाडीलकर, आदिंनी कुंठीत वेतन वाढीचा प्रश्न असोसिएशन ने यशस्वी सोडविल्या बद्दल अभिनंदन केले.

प्राचार्य डॉ. जे.बी.चौगुले यांनी केन्द्रीय कार्यकारणीने अल्पावधीत कुंठीत वेतन वाढीचा न्याय प्रविष्ट प्रश्न सोडविल्याबद्दल अभिनंदन तर केलेच विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे सांगली येथील सदस्यांचा उत्साह इतका दांडगा होता की त्यांनी स्वयंस्फुर्त रु.४०,०००/- असोसिएशनचे खाती देणगी जमा करुन त्याची पावतीच मा.अध्यक्षांच्या सुपूर्त करुन आश्चर्याचा धक्काच दिला. यातून प्रेरणा घेवून निपाणी येथील प्राध्यापकांनी रु.९०००/- ची देणगी दिली. तर इस्लामपूर येथील स.सदस्यांनी रु.२४०००/- ची देणगी जाहिर केली हे खास करुन येथे नमूद करावेसे वाटते.

या बैठकीत प्राचार्य आर.डी. राणे, प्राचार्य डॉ. जे.एम.मंत्री यांनी मार्गदर्शन केले. मा.अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात सदस्यांच्या उत्स्फूत देणगी बाबत आभार व्यक्त करुन असोसिएशनच्या भावी वाटचाली बद्दल विचार व्यक्त केले. सांगलीकरांकडून मिळालेल्या उत्तम प्रतिसाद व निपाणी, इस्लामपूरकरांची साथ निश्चितच असोसिएशनला बळकटीसाठी उपयुक्त ठरेल असा आशावाद व्यक्त केला व असाच प्रतिसाद इतर विभागांनी देऊन आमचा उत्साह द्विगुणीत करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

या बैठकी नंतर केन्द्रीय पदाधिकारी व स्थानिक पदाधिकारी यांनी सहसंचालक कार्यालय कोल्हापूर यांच्या कार्यालयास भेट देऊन सहसंचालकांशी संपर्क करुन त्यांच्या कार्यालयाने कुंठीत वेतन वाढ वसुल रकमा अदा करितांना कांही त्रुटया राहित्या त्या बाबत चर्चा

केली.त्यानंतर इस्लामपूर येथील प्राचार्य सायनाकर, प्राचार्य, दाभोळे आणि प्राचार्य जरे यांच्या आग्रही निमंत्रणामुळे इस्लामपूर येथे रात्री जाऊन तेथील सदस्यांशी चर्चा करुन परतलो.

**६) नागपूर विभाग बैठक दिनांक :- ११/१०/२०१२.**

ब-याच दिवसा पासून नागपूर विभागाचे तेथे बैठक घेण्यासाठी निमंत्रण होते. दिनांक ११/१०/२०१२ रोजी त्यांनी आयोजित बैठकीसाठी अध्यक्ष **डॉ.एम.ए.वाहुळ**, उपाध्यक्ष डॉ.जे.एम.मंत्री व संचालक डॉ.पी.के. निकम गेले होते. या बैठकीमध्ये डॉ.जे.एम. मंत्री यांनी असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रश्ना बाबत माहिती दिली तर डॉ. निकम यांनी पीएच.डी. धारकांच्या वेतनवाढीच्या प्रश्ना बाबत पुढे करीत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती दिली. या चर्चेत निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन करुन मा.अध्यक्षांनी समारोप केला.

या वेळी थोडयाच कालावधीत असोसिएशनने केलेले अथक परिश्रम व कार्याची यशस्विता लक्षात घेऊन प्रभावित होऊन प्रा.श्रीमती व्ही.पी.मोटे यांनी रुपये २०००/- चा धनादेश देणगी स्वरुपात संस्थेस सुपूर्द केला हे विशेष होय.

त्यानंतर नागपूर विभागाची कार्यकारणीची एकमताने निवड जाहिर करण्यात आली. ही बैठक आयोजन करण्यात डॉ. एम.आर.ठोसर, प्राचार्य ऐपतवार ए.आर. व डॉ.श्री.खंडे टी.जे. यांचा महत्वाचा वाटा आहे.

**७) अमरावती विभाग बैठक दिनांक :- १२/१०/२०१२**

दुपारी दोन वाजता आयोजित बैठकीस आम्ही तिघे अमरावतीस गेलो. या बैठकीमध्ये असोसिएशनने हाती घेतलेल्या कामाची माहिती डॉ.जे.एम. मंत्री यांनी दिली. पीएच.डी. संबंधी केलेल्या कामाचा आढावा डॉ. निकम पी.के. यांनी सादर केला. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्ना बाबत माहिती देऊन मा.अध्यक्षांनी समारोप केला. या बैठकीचे आयोजन डॉ. एम.फारुखुल्ला यांनी केले होते.

८) जळगांव येथे होणा-या दिनांक १८/१२/२०१२ च्या सर्व साधारण सभेची रुपरेषा ठरविण्यासाठी जळगांव येथील प्राचार्य आर.डी. राणे, प्रा.एम.के. येवले डॉ.ए.बी.पाटील व प्रा.टी.के. अत्तरदे यांनी औरंगाबाद येथे येवून केन्द्रीय कार्यकारणीशी विचार विनिमय केला. या बैठकीत सर्व साधारण सभेच्या नियोजनाचे सर्व अधिकार जळगांव शाखेस देण्यात आले.

**९) जळगांव विभाग भेट दिनांक :- ०८/१२/२०१२**

असोसिएशनची वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक १८/१२/२०१२ रोजी जळगांव येथे आयोजित केली आहे. त्या सभेच्या आयोजन, विषय पत्रिका व एकंदरीत सभेच्या कामाचे स्वरुप ठरविण्यासाठी अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहुळ, उपाध्यक्ष डॉ. जे.एम.मंत्री व सचिव प्राचार्य मोहंमद शफी यांनी जळगांव शाखेत भेट देऊन विभागीय कार्यकारणी सदस्या सोबत चर्चा करुन पुर्व तयारीचा आढावा घेतला.

**न्यायालयीन लढया बाबत :-**

सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सेवा निवृत्तांचे कांही प्रश्न निर्माण झाले. त्या बाबत शासनाकडे निवेदने दिली. संचालक, उच्च शिक्षण मंत्री यांना भेटण्याचा प्रयत्न केला परंतु कुठल्याच प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे शेवटी असोसिएशनला आपल्या न्याय मागण्यासाठी न्यायालयाकडे जाणे शिवाय पर्याय राहिला नाही. संबंधीत सदस्यांचे सहकार्य व पदाधिका-यांचा या प्रश्नांसंबंधीचा अभ्यास, योग्य वकीलाची निवड व सततचा पाठपुरावा, यासाठी पदाधिकारी हया वयात ही जागरुकतेने अथक परिश्रम करुन सदर न्यायालय प्रकरणे यशस्वीपणे हाताळत आहे हे निश्चितच खालील बाबीवरुन दिसून येईल.

**१) कुंठीत वेतन वाढ :-**

शासनाने ६ व्या वेतन आयोगातील सेवा निवृत्तीधारकांचे वेतन निश्चित करतांना महत्तम पगारानंतर दोन वर्षाला एक या प्रमाणे ज्या वेतन वाढी दिल्या होत्या त्या रकमा वसूल केल्या त्या विरोधात संघटनेने उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये एकूण ४ याचिका दाखल केल्या होत्या. या चार याचिकापैकी ३ याचिकेचे निकाल दिनांक ०१/०२/२०१२ पर्यंत लागले होते. व चौथी याचिका ७८३८/२०११ चा निकाल प्रलंबित होता. तो निकाल देखील दिनांक ०४/०७/२०१२ रोजी लागला मा.उच्च न्यायालयाने सदर याचिका धारकांच्या वसूल केलेल्या रक्कमा १२% व्याज दराने देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतरही विविध विभागाकडून वारंवार कुंठीत वेतनवाढ वसुली झालेल्या प्राध्यापकाकडून संघटनेकडे आणखी एक याचिका दाखल करण्याची मागणी करीत होते. न्यायालयाने सुध्दा आपणास गटा गटाने न येता Come in Bulk अशा प्रकारे सुचना केली होती म्हणून विविध विभागांना भेटी देऊन संबंधीत ९४

प्राध्यापकांची ५ वी याचिका ६५१६/२०१२ असोसिएशन ने दाखल केली.सदरचा निकाल येणे आहे.

पहिल्या दोन याचिकेचे निकाल लागूनही व न्यायालयाने मुदत देऊनही शासनाच्या या प्रकरणी काहींच हालचाली दिसून आल्या नाही म्हणून दिनांक १६/१२/२०१२ रोजी अवमान याचिका दाखल केली. **मा. न्यायालयाने** दिनांक २४/०२/२०१२ **ला शासनास पैसे** व्याजासहीत भरा नसता शिक्षेस तयार व्हा असे सुनावले त्या रोजी मात्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात जाण्यास परवानगी घेतली. दिनांक १७/०३/२०१२ रोजी आपण सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले. दिनांक ९ मे २०१२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने शासनाचे अपील फेटाळले. तरी देखील शासन वरील रकमा व्याजासहीत तीन महिन्यात परत करण्यास उत्सुक नव्हते म्हणून पुन्हा पहिल्या दोन याचिकेच्या रकमा मिळणे बाबत अवमान याचिका क्र.५१८/२०११ क्र.५१९/२०११ आपण दाखल केल्या या बाबतचा निकाल दिनांक ०८ ऑगस्ट २०१२ रोजी लागला. त्या वेळी मात्र शासनाने कुंठीत वेतन देणे बाबत उच्च न्यायालयाची बीनशर्त माफी मागून सदर वसुलीच्या रकमा व्याजासहित दिनांक २८/०८/२०१२ पर्यंत देण्याचे आदेश दिले.(शासन आदेश ३ ऑगस्ट २०१२) या आदेशाची अंमलबजावणी सह संचालक औरंगाबाद यांनी ऑगस्ट अखेर पर्यंत व्याज देवून सर्व संबंधीताच्या रकमा अदा केल्या. कोल्हापूर, सोलापूर व नांदेड विभागाने याचिका कर्त्याच्या रकमा जानेवारी अखेर पर्यंतच व्याजासहित दिल्या.

जळगांव विभागात १९ याचिकाकर्ते होते त्या पैकी ५ याचिकाकर्त्यांनाच रकमा दिल्या १४ याचिकाकर्ते राहिले आहेत. पुणे विभागात २ याचिकाधारक होते त्यांनाच वगळून अवमान याचिकेस नसलेल्या दोघांना रकम अदा करुन आपला अनागोंदी कारभाराचा कळसच गाठला आहे.

नागपूर विभागात २ याचिकाकर्ते होते त्यांना अद्यापही रक्कम मिळाली नाही. या सर्व प्रकरणात असोसिएशनला ब-याच हालचाली व सातत्याने प्रत्येक विभागास याचिकाकर्त्यांना रकमा मिळविण्यासाठी पाठपुरावा करावा लागला. तरी परंतु पहित्या दोन याचिके संबंधी संपूर्ण कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही त्यास्तव मा. अध्यक्षांनी शिक्षण सचिवास अधिका-याचा बेजबाबदारपणा व टोलवा टोलवी, अपुरी माहिती बाबत एक सविस्तर पत्र दिनांक

०५/१२/२०१२ रोजी लिहीले आहे. हे विशेष होय. याचिका क्र.३ व ४ बाबत अवमान याचिका दाखल देखील केली आहे.

**२) पीएच.डी. धारकाच्या वेतनवाढी संबंधीच्या याचिका :-**

मागील बैठकीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील १३२ प्राध्यापकांना पीएच.डी. **वेतन वाढ** मिळाली नाही त्या **पैकी ७० प्राध्यापकांची** प्रकरणे मंजूरीस पाठविण्याची माहिती दिली होती. मात्र संबंधीतास वेतन वाढी अद्याप मिळाल्या नाहीत. म्हणून विविध विभागातून या संबंधी माहिती घेवून उच्च न्यायालयात जाण्याचे ठरविण्यात आले. त्या प्रमाणे १९८६ पूर्वी पीएच.डी.धारकांना तीन वेतन वाढी बाबत २५ सदस्यांची एक याचिका व दिनांक ०१/०१/१९९६ पासून २ वेतन वाढी साठी १०१ याचिकाकर्त्यांची दुसरी याचिका मा.खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केली आहे.

**३) ग्रॅच्युईटी (उपदान बाबत) :-**

६ व्या वेतन आयोगातील सेवा निवृत्तीधारकांना शासनाने जाहिर केल्या प्रमाणे ७ लाख पर्यंत ग्रॅच्युईटी मिळावी त्यास्तव आपण उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये याचिका दाखल केली होती. हा निकाल आपल्या बाजूने न लागल्यामुळे आपण सर्वोच्च न्यायालयात Special Leave petition दाखल केले आहे.

५ व्या वेतन आयोगातील सेवा निवृत्तांना २.५ ऐवजी ३.५ लाख रुपये उपदान मिळणे साठी असोसिएशनने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करणेसाठी निधी जमा केला होता. मात्र कायदेशिर अडचणीमुळे आणि विधीज्ञाच्या सल्ल्यामुळे सध्या तो निर्णय स्थगित केला आहे. म्हणून याचिकाकर्त्याच्या रकमा त्या त्या विभागाद्वारे परत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**४) सहावा वेतन आयोगातील शिफारशी प्रमाणे ५ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तीधारकांना सुधारित सेवानिवृत्ती वेतन मिळणे बाबत.**

महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकांचा स्वतंत्र प्रवर्ग आहे. या प्रवर्गाची वेतन श्रेणी ठरविण्याचे काम मानव विकास संशोधन मंत्रालय करित असते. भारत सरकारचा अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाकडे दिला जातो. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोग राज्य शासनाला वेतन श्रेणी बाबत शिफारस करते त्या नुसार शिक्षकांना वेतन श्रेणी दिल्या जातात.

अनेक राज्य शासनाने त्यांच्या राज्यात ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतन देणे सुरु केले आहे. मात्र महाराष्ट्र शासन अपवाद आहे. या बाबतचा मसुदा उच्च न्यायालयात याचिका दाखल करणेसाठी तयार करण्यात आला आहे. सविस्तर माहिती प्राचार्य आर.डी. राणे आपणांस देतील.

या सर्व वाटचाली मध्ये आपल्या सर्वांचा सक्रीय सहभाग आमचा उत्साह निश्चितच वाढवितो.

**"आपली एकजूट हिच आपली शक्ती"** आपल्या भावी कार्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

धन्यवाद

**डॉ. जे.एम. मंत्री**

उपाध्यक्ष